# अलौकिक

## भारतरत्न स्वरसम्राज्ञी लतादीदी

लेखक - अनंत पावसकर



## ।। अलौकिक ।।

### थोर गायिका - भारतरत्न 'लतादीदी'




आपल्या मातृतुल्य 'लतादीदी'!! 'गानकोकिळा', 'स्वरसम्राज्ञी', 'क्वीन ऑफ मेलडी' अशा अनेक उपाधी रसिकांनी त्यांना आदरपूर्वक दिल्याच आहेत. तर.. भारत सरकारने त्यांच्या संगीतक्षेत्रातील उत्तुंग अशा असामान्य कामगिरीमुळे, 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण' आणि 'भारतरत्न' असे पुरस्कारही सन्मानाने प्रदान केले आहेत. 'दादासाहेब फाळके पुरस्कार', 'फिल्मफेअर', अनेक सन्माननीय संस्थांकडून मानद 'डॉक्टरेटस्', 'जीवनगौरव' पुरस्कारांनी सन्मानित.. अशा या आपल्या लाडक्या मातृतुल्य आदरणीय 'लतादीदी'! ज्या स्वराने आपलं धकाधकीचं दैनंदिन जीवन काहीसं सुसह्य केलं आहे, असा हा स्वर्गीय स्वर! त्यांच्या जन्मदिनाप्रीत्यर्थ, आपल्या मनातलं काहीतरी वेगळं असं लिहायलाच हवं असं सतत वाटत होतं. पण!! आपण तर एक सर्वसामान्य संगीत-रसिक! आपल्या 'लतादीदींबद्दल' शेकडो ग्रंथ, पुस्तके आणि 'यू-ट्यूबवर' शेकडो व्हीडिओज उपलब्ध असताना.. आपण लिहिलेलं कोण वाचणार? असा यक्षप्रश्नही समोर होताच. मग मला माझा परममित्र.. ज्येष्ठ पत्रकार/लेखक 'अभय परांजपे' याने धीर दिला..! 'मित्रा.. आपल्या लाडक्या लतादीदींच्या विषयावर शेकडो पुस्तके प्रकाशित झालीत.. काहीजण तर यावर 'पी. एच. डी.' करताहेत! कोणत्याही संगीत रसिकाला आपल्या लाडक्या दीदींच्या कारकिर्दीतील अनेकाविध पैलूंबद्दल पुनःपुन्हा वाचायला नक्कीच आवडतं. कारण 'मातृतुल्य लतादीदी'.. ही त्यांच्या देवघरातील देव्हाऱ्यात अखंडपणे मंद-मंद प्रकाश देणारी.. अखंड ज्योत असते! तर.. मित्रा.. किमान स्वतःच्या समाधानासाठी तरी लिही! पुढचं पाहू!.. लतादीदींचं कोणतंही गाणं ऐकून आपण ब्रह्मानंदी लीन झाल्यागत तल्लीन होतोच ना?! अमुक चित्रपटातील गाण्यांचा केवळ 'ऑडिओ' ऐकताना, ते गाणं रुपेरी पडद्यावर सादर करणारी अभिनेत्री.. चक्क मूर्त स्वरुपात आपल्या मनःचक्षुसमोर आकार घेते. याचं नेहमीच आश्चर्य वाटतं की

नाही!? म्हणून त्यावर काही लिही!! आणि.. मुख्य म्हणजे ते सर्वथा वेगळं असेल!' मग मात्र मला खूप हुरूप आला! आणि.. आता मी त्याच वेडाने जणू झपाटलोच!

केवळ गंमत म्हणून.. पण विस्ताराने सांगायचं तर.. गुरुवार दि, २० फेब्रुवारी, १९९७! ती सकाळची वेळ होती! आमच्या 'व्हीनस' म्युझिक कंपनीच्या, 'ब्ल्यू-डायमंड' या रेकॉर्डिंग स्टुडिओत 'येस बॉस' या चित्रपटातल्या एका गाण्याचं रेकॉर्डिंग होतं.. वादक मंडळी येत होती. पुढे खूप व्यस्त असं शेड्युल असणार होतं यार! टेन्शनमध्येच होतो. पण.. अचानक एक व्यक्ती, सोबतचा लवाजमा आणि आपल्या स्टेनगनवाल्या सिक्युरिटीसह समोर येऊन उभी ठाकली. (गेटवरचा 'सिक्युरीटी गार्ड' क्षणार्धात ढेपाळला असणार.. हे काय मी सांगू!? त्याने तर घाबरून 'बीग बॉस.. रतनजींना' फोन करून आप-बीती सांगितलीच होती..!!) बाप रे!! अचानक घडलेल्या या घटनेमुळे माझ्या तर काळजाचा ठोकाच चुकला होता, की हो!. पुढच्या दोनेक मिनिटात समजलं की.. ते आपल्या या जुहू-तारा रोड या पंचक्रोशीतील शिवसेनेचे अत्यंत सन्माननीय असे ज्येष्ठ नेते आहेत! 'शिव उद्योग' (सन्मा. श्री राज ठाकरेसाहेब पुरस्कृत) या समुहातर्फे आयोजित होणार असलेल्या.. 'सन्मा. लतादीदी' यांच्या अतिशय भव्य अशा महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या, मला अगदी आपलेपणाने सन्मानिका देण्यासाठी ते आले होते. मला हे सत्य माहीत होताच मी क्षणार्धात खूपच हळवा झालो! भारावून गेलो! (मी 'दैनिक सामना'चा ज्येष्ठ पत्रकार असल्याने मला हे भाग्य लाभलं होतं.. बरं!) त्यातच आमच्या 'बॉसचा' फोन आला.. मी 'सर्वकाही आलबेल असल्याचं सांगताच..' विषय संपला! हुश्श!! मी त्या साहेबांसह.. त्यांच्यासोबत असलेल्या सर्वांसाठी एकीकडे चहापानाची व्यवस्था करवली खरी.. पण त्या सर्वांचं लक्ष होतं ते आमच्या रेकॉर्डिंग स्टुडिओकडे!! कारण.. हे विश्व त्यांच्यासाठी पूर्णतः वेगळं होतं.. जरा हटके!! आमच्या 'ब्ल्यू-डायमंड' स्टुडिओचं एकंदर सांगीतिक वातावरण पाहून प्रत्येक जण खूपच भारावून गेला होता. त्या 'स्टेनगन्सनी' तर केव्हाच मान टाकली होती. मला ती मानसिकता लागलीच लक्षात आली..! मी त्या.. (मनाने संगीतरसिक असलेल्या..) सर्वांना.. अगदी आपलेपणाने सांगितलं.. ''.. जा.. आत अगदी बिनधास्त जा! चित्रपटातलं गाणं.. नेमकं कसं बनतं ते पहा!! बघा! अनुभवा!!'' मी त्या सर्वांना हवं तिथे फिरण्याची मुभा देताच.. सर्वच जण.. अगदी 'ज्युनियर के.जी.' चे निरागस विद्यार्थी असावेत तसे.. आत घुसलेच.. आमचा 'फिल्म-रेकॉर्डिंग स्टुडिओ' पाहून खूपच भारावून गेले. नंतर सर्वजण तिथे चक्क तासभर रमले. सन्मा. गायक कुमार सानू, अभिजीत, अलकादीदी, जतीन-ललित यांच्यासह अनेकांना भेटून खूपच खूष झाले.. (त्याच्या हातात 'स्टेनगन' आहे, म्हणून ते 'सेलेब्रिटीज' दबावाखाली बोलले असतील का?! माहीत नाही!! पण.. जतीन-ललित, अलकादीदी, कुमार सानूदा, अभिजीतजी... त्यांच्याशी.. त्यांनी मस्तच संवाद साधला..!! हे विशेष!!)

तर.. हा कार्यक्रम रविवार, दि. ९ मार्च, १९९७ रोजी 'अंधेरी स्पोर्टस् कॉम्प्लेक्स' इथे आयोजित केला जाणार होता. सहकुटुंब गेलो होतो मी! ही आठवण सांगायचं कारण हे.. की या अतिशय सुरेल कार्यक्रमात लतादीदींनी सर्वच गाणी अगदी खुमासदार रित्या पेश केली. या सादरीकरणातील एक महत्त्वाचा भाग अधोरेखित करायचा झाला... तर.. आपल्या लाडक्या मातृतुल्य लतादीदींनी 'मधुबाला ते तब्बू' असा आपला पाच दशकांचा पट 'मेडली' स्वरुपात.. सलग अर्धा तास गात मांडला होता. (ही पेशकश 'यू-ट्युबवर' आहे. सोबत 'लिंक' देतोय! नक्की पहा) ही 'कॉन्सर्ट' सर्वांसाठीच खरोखरच अविस्मरणीय ठरली.. आणि लेखनासाठी मला एक सर्वथा वेगळा असा विषय सापडला.

विषय सापडला खरा! पण तो शब्दात मांडायचा कसा बरं!? काहीही सूचत नव्हतं. याचं मूळ शोधण्याचा माझा आटापिटा करताना मला, माझ्या लहानपणीची एक घटना आठवली. (ही आठवण थेट पन्नास वर्षांपूर्वीची आहे बरं!) आम्हा बच्चेकंपनीला गाण्यांची गोडी नेमकी लागली कशी!? तर.. आमच्या मुंबई सेंट्रल - बी. आय. टी. चाळीत, प्रत्येक २६ जानेवारीला आमच्या मजल्यावर 'सत्यनारायणाची सार्वजनिक महापूजा' यथासांग पार पडत असे.. ही पूजा संपन्न होताच त्या रात्री आमच्या शेजारीच राहणारे 'श्री. तावडेमामा' (हे 'विनोद तावडे' याचे सख्खे काका बरं !) ते, त्यांचे समवयस्क मित्र, तरुण मुलं व आम्हां बच्चेकंपनीसह एक जबरदस्त संगीत मैफल जमवायचे. हे आठवतंय! एक-दोन भजनांपासून सुरु होणारा हा कार्यक्रम पुढे तास-दोन तास फिल्मी गाणी ते कव्वालीपर्यंत उत्तरोत्तर रंगत जात असे! मध्येच मजल्यावरील

माझ्या आईसह, अनेक काकूंतर्फे तिथल्या उपस्थितांना 'गरमागरम चहा, नाश्ता..' दिला जात असे! सुरुवातीला काही भजने तल्लीनतेने गाऊन होताच.. नंतर मैफिलीची गाडी अचानक फिल्मी गीतांकडे वळत असे.. 'दिन है सुहाना आज पहली तारीख..', 'आ के सीधी लगे दिल पे..', 'अरे भाई निकल के..', 'कमाता हूं..', 'एक दिन हमारी भी दाल गलेगी..', 'भोली सूरत..' अशा रंगारंग गाण्यांचा सिलसिला.. अव्याहतपणे सुरू असे. मात्र कळसाध्याय म्हणून.. 'अच्छी सूरत हुई या मुसीबत, गली में आना जाना बंद..' हे लोकगीत किंवा कव्वाली अंगाने जाणारं गाणं, ते नेहमी सादर करत असत. धम्माल यायची! आणि हो! इथे साथीला वाद्ये काय असायची माहित्येय ? तर चक्क भजनाचे टाळ, मृदुंग, ढोलक असायचे. कारण ते भजनासाठी म्हणून आधीच आणलेले असत. (ओ माय गॉड !!) 'गली में आना जाना बंद..' हे गाणं कदाचित त्या तत्कालीन बुजुर्गांमध्ये भले लोकप्रिय असेल. पण आम्ही मात्र अनभिज्ञ होतो. कारण ते रेडिओवर कधी वाजवलं गेल्याचं माझ्यातरी ऐकिवात नव्हतं. (दर बुधवारी संध्याकाळी सादर होणाऱ्या 'बिनाका गीतमाला - या साप्ताहिक कार्यक्रमाची इंटरनेटवरील' माहिती पाहिलीत... तर तिथेही या गाण्याचा उल्लेख सापडणार नाही.) ते कुणी गायलंय, कोणत्या सिनेमातलं, की खाजगी ? याचा आम्हां बच्चेकंपनीला, त्याकाळी तरी अजिबात गंध नव्हता. आम्ही पुढे मोठे झाल्यावर 'कॅसेटस्चा' जमाना आला. तरीही या गाण्याबद्दलची माहिती (ध्वनिमुद्रिका संग्राहक वगळता) कुणाकडे असेल असं आढळलं नाही.. मग काय!.. आपसुकच नंतर ते गाणं आमच्या पिढीच्या विस्मृतीतही गेलं. असो! 'यू-ट्यूब' येताच रसिकांसाठी 'संगीताचा जणू खजिनाच' उपलब्ध झाला. एकदा सहजच सर्फिंग करताना.. ते गाणं नेमकं सामोरं आलं. ते 'पहली झलक - १९५५' - (संगीतकार 'सी. रामचंद्र') या चित्रपटातलं असून, ते आपल्या 'लतादीदींनी' गायलंय यावर क्षणभर विश्वासच बसेना! पुनःपुन्हा ऐकलं. मजा आया यार! इंटरनेटवरील उपलब्ध माहितीनुसार 'बिनाका गीतमाला - १९५५ - या वार्षिक कार्यक्रमाची यादी तपासता' दीदींची एकूण सहा गाणी आढळतात.. 'मेरा सलाम ले जा..', 'मन डोले मेरा..', 'इचक दाना..', 'मेरा दिल ये पुकारे..', 'मोरे सैयाजी उतरेंगे..', 'गुल मुस्कुरा उठा..'! तर स्पष्टपणे सांगायचं तर.. 'गली में आना जाना बंद..' कुणाच्या जणू खिजगणतीतही नव्हतं. उपरोल्लेखित सहा गाणी, तसेच त्या संपूर्ण वर्षात दीदींनी गायलेल्या इतर सर्व गाण्यांपेक्षा, 'गली में आना जाना बंद..!' हे सर्वथा वेगळ्या 'जॉनरचं' होतं हे मान्य करावंच लागतंय, यार! बाय द वे ! या गाण्याबद्दल इतकं का सांगतोय ? असं तुम्ही साहजिकच म्हणाल!.. तेच मांडण्याचा मी एक प्रयत्न करतो आहे. का कुणास ठाऊक!.. आपल्या हृदयसिंहासनावर विराजमान असलेल्या दीदींच्या गाण्यांविषयी, एखादा विषय हा कसा व आपोआपच सामोरा येतो, ते पहा! दीदींच्या त्या काळातल्या गाण्यांचा थोडासा खोलात जाऊन आपलेपणाने अभ्यास करायचा तर.. त्यांचं वय अवघे पंधरा-सोळा वगैरे असूनही चाळीस आणि पन्नासच्या दशकात.. लतादीदींनी अनेक गाणी गायली आहेत, हे सर्वश्रुतच आहे. ('इस लडकी की आवाज बहोत ही पतली है..' असा रिमार्क देणारे ते निर्माते शशधर मुखर्जी आणि 'वरण-भात खाणारी, उर्दू उच्चार कसे बरे करणार..' अशी तुच्छतेने शेरेबाजी करणारा 'दिलीप कुमार' क्षणभर विसरूया !) फाळणीनंतर गायिका 'नूरजहाँ' पाकिस्तानात गेल्या. तेव्हां लतादीदींचं वय सुमारे अठरा-एकोणीस वर्षांचं होतं. हेही लक्षात घ्या ! सुरुवातीच्या काळातील दीदींच्या गायकीवर, 'नूरजहाँ' यांचा जबरदस्त प्रभाव होता असं बुजुर्ग म्हणतात. पण दीदींची त्या काळातल्या गाण्यांची यादी अभ्यासली तर मला तरी तसं वाटत नाही. 'बरसात में, हमसे मिले..', 'चले जाना नहीं..', 'चंदा जा रे..', 'मेरी आँखो में..', 'साजन की गलियाँ छोड..', 'उठाए जा उनके..' अशी कित्येक गाणी लागलीच आठवतात. अर्थात संबंधित संगीतकारांच्या चालीबरहुकूम त्या गायल्या आहेत. मात्र १९४९ सालच्या 'महल' सिनेमातल्या 'आएगा आनेवाला..' (संगीत : खेमचंद प्रकाश) या एका गाण्यानंतर दीदींना खरीखुरी लोकप्रियता मिळू लागली. एक गोड आवाजाची गायिका लाभल्याचं समाधान, तत्कालिन संगीतकाराच्या चेहऱ्यावर दिसू लागलं होतं यात नवल ते काय? ही गाणी ऐकताना, दीदींनी आपल्या वाट्याला आलेलं प्रत्येक गाणं, त्या त्या संगीतकाराच्या चालींना प्रामाणिकपणे न्याय देत आत्मियतेने सादर केल्याचं जाणवतं. पण दिग्गजांच्या मते, लतादीदींच्या सादरीकरणातून अधिक प्रगल्भता जाणवू लागली ती १९५१ नंतर. मलाही एक सर्वसामान्य रसिक म्हणून तसंच वाटतं! कारण यापुढच्या काळातील दीदींच्या गाण्यांची यादी बारकाईने पाहिली तर सी. रामचंद्र, शंकर-जयकिशन, मदनमोहन, एस. डी. यांच्यासह अनेक नामवंत संगीतकारांनी, दीदीच्या आवाजातील गोडवा आणि रेंज ओळखून, त्यानुसार कंपोझिशन्स केल्या असाव्यात. मी 'गली में आना जाना बंद..' (पहली झलक - १९५५) या गाण्यावर ऊहापोह का करतोय?.. तर ते भन्नाट गाणं त्या सिनेमात अभिनेत्री 'वैजयंतीमाला' वर चित्रित झालंय. योगायोगाने 'मधुमती' (१९५८) मध्येही 'वैजयंतीमालाच' होती, म्हणून.. आता तुलना करायचा मोह

मला आवरत नाहीय. लक्षात घ्या ! ‘पहली झलक’ मधलं.. ‘गली में आना जाना बंद..’ दीदींनी, अण्णांनी दिलेल्या चालीला अपेक्षित असा न्याय देत भले गायलं होतं.. पण ‘वैजयंतीमालाने’, पडद्यावर ज्या ‘ठसक्यात’ ते पेश केलंय.. ते स्वतः दीदींनांही थक्क करणारं ठरलं असावं. त्यात वेगळेपण जाणवल्यानेच की काय.. आपला हा गायनाविष्कार दीदींनी पुनःपुन्हा अभ्यासला असावा. आपल्या आवाजातलं गाणं.. पडद्यावर सादरीकरण करणाऱ्या अभिनेत्रीला पूर्णतः ‘मॅच’ होतंय यापेक्षा दुसरा आनंद तो कोणता! (हाच.. दिदींच्या गायकीचा ‘टर्निंग-पॉइंट’ असेल का? हे मात्र मी ज्येष्ठ विचारवंत, पत्रकार व अभ्यासकांवर सोडतोय.) आणखी काही उदाहरणं सांगायची तर.. ‘धीरे से आजा री..’, ‘तुम ना जाने..’, ‘ठंडी हवाए..’, ‘शाम ढले..’ ‘घर आया मेरा परदेसी..’ अशी काही गाणी नक्की ऐका. मला ‘सीमा’ (१९५५) चित्रपटातलं ‘मनमोहना बडे झूटे है..’ आठवतंय. सचिनदांनी ‘जयजयवंती’ रागात हे गुंफलं होतं. ‘प्युअर’ शास्त्रीय चीजच ती! पडद्यावर ‘नूतन’! नूतन या स्वतः गायिका असल्याने दीदींचं हे गाणं अगदी जीव ओतून सादर केलं आहे. नूतनजी जणू स्वतःच गात आहेत, असं वाटतं! आपल्या दीदींच्या.. दीदार (१९५१), बैजू बावरा (१९५२), अमर (१९५४), उडन खटौला (१९५५), देवदास (१९५५), चोरी चोरी (१९५६), मदर इंडिया (१९५७), देख कबिरा रोया (१९५७) इथपर्यंतचा प्रवास पाहिला तर तो थक्क करणारा आहे. दीदींना एक सवय होती.. (ज्याचं नव्या पिढीतल्या गायकांनी अनुकरण करायला हवं..बरं का!) गाण्याचं काव्य, समजून घेत त्या गाण्यातले शब्द-नी-शब्द त्या स्वतःच्या हस्ताक्षरात.. एका कागदावर लिहून काढत असत. त्यात.. कुठे कुठे चढउतार घ्यायचे, कुठे पॉझ घ्यायचा?.. वगैरे त्यांना समजतील अशा काही खास खुणा केलेल्या असत. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट होती की, संगीतकार.. मग तो वयाने थोर असो, अथवा तरूण; दीदी त्याच्या समोर अगदी निरागस/निर्विकार चेहऱ्याने, मनाची पाटी कोरी करून बसत असत. गाणं समजून घेत असत. संगीतकाराचं समाधान होईपर्यंत रिहर्सल करत असत. सिनेमातली सर्वच गाणी ही ‘सिच्युएशन-साँग्ज’ असतात.. (दिलेल्या चालीत, एकाच रागावर ठहराव असेल असं नेहमीच नसतं.) संगीतकाराने आकाराला आणलेल्या गाण्याची नेमकी चाल, सिनेमातला ‘तो’ नेमका प्रसंग, मूड, गायकाकडून त्यांना अभिप्रेत असलेली ‘थॉट’/‘थ्रो’ त्या.. (आपण थोर गायिका आहेत वगैरे ‘ईगो’ न कुरवाळता.) शांतपणे समजून घेत असत. तिथे त्या गाण्याचा गीतकार उपस्थित असल्यास तर त्याला अपेक्षित उच्चारही, त्या निःसंकोचपणे समजून घेत. (हे अगदी कालपरवापर्यंतचं.. बरं!!) ‘टेक’ झाल्यानंतर, संगीतकारचं पूर्णतः समाधान झालेलं दिसत असूनही, त्या आपली इमेज, वय, अनुभव याचा बाऊ न करता.. नम्रपणे ‘आणखी एखादा टेक करायचाय का?’ असं विचारण्यास त्या अजिबात संकोचत नसत.



लतादीदींची आणखी एक आठवण सांगायची तर.. (आम्ही ध्वनिमुद्रण क्षेत्रातील लोक हे जाणतो..बरं का!) 'क्वार्टर इंच' नामक स्पूल्स, व कालौघात 'कॅसेटस्' उपलब्ध झाल्यानंतर.. लतादीदी.. आपण गायलेल्या गाण्याची 'टेप', गाणं निवांतपणे ऐकण्यासाठी घरी घेऊन जात असत. (गंमतीने सांगायचं तर.. या टेपला.. म्हणूनच की काय पुढे 'मदर टेप' असं नाव पडलं असावं!) काहीही असो ! मला वैयक्तिकरित्या वाटतं, 'गली में आना जाना बंद..' या गाण्यावरचं 'वैजयंतीमालाचं' सादरीकरण पाहिल्यानंतर लतादीदी थक्क झाल्या असाव्यात आणि तत्क्षणी त्यांनी मनोमन ठरवलं असावं की.. यापुढे आपण जी जी गाणी गाणार आहोत.. ती पडद्यावर नेमकी कुणावर चित्रित होणार आहेत हे जाणून घेणं अत्यंत गरजेचं आहे. सदर अभिनेत्री ते कसं सादर करेल, याची कल्पना करायला काय हरकत आहे! कधीकधी, अनेक नट्या आपल्या गाण्याच्या 'रेकॉर्डिंगला' आवर्जून उपस्थित राहतात, हेही खरंच!) दीदींची ही मानसिकता, याच टप्प्यावर रुजायला सुरुवात झाली असेल का ? (हे मात्र मी नम्रपणे तुमच्यावर सोडतो.)

आता 'मधुमती' कडे वळूया.. इथे दीदींची पाच गाणी आहेत. दोन युगलगीतं आणि तीन सोलोज. (ही सर्व गाणी कान देऊन ऐकत, नक्की पहा! 'लिंक्स्' दिल्या आहेत! ) आपल्यासारख्या गानलुब्ध रसिकांनी.. त्या गाण्यांचे नुसते 'ऑडिओ' ऐकले ना तरी.. डोळ्यांसमोर मूर्त स्वरूपात साकारते ती.. 'वैजयंतीमालाच' !! अरे! हाच तर माझ्या या लेखाचा विषय आहे! याबाबतीत आणखी सांगायचं तर.. दि. १० मे, १९५९ रोजी दिमाखात पार पडलेल्या 'फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात' लतादीदींना 'आजा रे.. परदेसी..' या गाण्यासाठी गौरविण्यात आलं. दीदींचं हे पहिलं 'फिल्मफेअर अ‍ॅवॉर्ड' बरं! (या 'मधुमती' ला एकूण १२ नॉमिनेशन्स मिळालेली, तर ९ पारितोषिके मिळाली. वैजयंती माला यांना तर 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री' पुरस्कारासाठी चक्क दोन 'नॉमिनेशन्स' होती. 'मधुमती' आणि 'साधना'! मात्र 'साधना' मधील भूमिकेचा गौरव झाला!) 'मधुमतीच्या' नंतर म्हणजे १९५८, १९५९ आणि १९६० मध्ये प्रदर्शित झालेल्या सिनेमांची यादी सहजच नजरेखालून घालूया. मी फक्त सिनेमांची नावं देतोय. त्यात 'लतादीदींची' गाणी कोणती याचा गृहपाठ मात्र तुमचा तुम्ही करायचाय. (हे सोपं जावं म्हणून, लतादीदींच्या शेकडो गाण्यांच्या 'यू-ट्युब प्ले लिस्टस्' सोबत दिल्या आहेत.) यातून होईल काय? तर दीदींची गाणं सादर करण्यातील प्रगल्भता व सहजता.. उत्तरोत्तर कशी बहरत गेली ते तुम्हाला अनुभवता येईल! त्या त्या अभिनेत्रीला साजेसं 'अ‍ॅक्सेंट/अ‍ॅटिट्युड' त्यांनी कसं खुबीने पेश केलंय हे तुम्हाला प्रत्येक गाण्यातून जाणवेल, हे नक्की! १९५८ ची 'यहुदी', 'अदालत', 'अजी बस शुक्रिया', 'अमरदीप', 'जेलर', 'पोस्ट बॉक्स ९९९', 'सम्राट चंद्रगुप्त', 'सुवर्णसुंदरी' या सिनेमातली गाणी. तर नंतर १९५९ मधले 'अनाडी','छोटी बहन', 'बेदर्द जमाना क्या जाने','चाचा झिंदाबाद','दुनिया न माने', 'गुंज उठी शहनाई', 'काली टोपी लाल रुमाल','कन्हैया','लव्ह मॅरेज', 'मदारी', 'मैं नशे में हूँ', 'सट्टा बाजार','सावन','शरारत','उजाला' असे अनेक सिनेमे दृष्टीपथात येतात. १९६० बद्दल बोलायचं तर 'मुघल-ए-आजम', 'बरसात की रात', 'कोहिनूर', 'जिस देश में गंगा बहती है', 'दिल अपना और प्रित पराई', 'छलिया','घुंघट','बहाना', 'दिल भी तेरा हम भी तेरे', 'एक फूल चार काँटे', 'परख', 'उसने कहा था' किती नावे सांगू? अशा संगीताच्या सुवर्णयुगातील लतादीदींच्या गाण्यांनी आपल्या हृदयासिंहासनावर अधिराज्य गाजवलं आहे. जर फावल्या वेळात या प्रत्येक सिनेमातील गाण्यांचा आस्वाद घ्यायचा ठरवलात ना.. तर तो खजिना अक्षरशः वर्षभर पुरेल ! (सांगीतिक 'इम्युनिटी बुस्टर' म्हणतात ते हेच असेल ना!)

१९६० नंतर म्हणजे दीदी, वयाच्या तिशीच्या उंबरठ्यावर असताना या स्वराने तर परमोच्च शिखर गाठलं, यात कोणतीही अतिशयोक्ती नाही. याच काळात 'पंचमदा' संगीतकार म्हणून सामोरे आले.. मेहमूदच्या 'छोटे नवाब' (१९६१) या सिनेमात लतादीदींची पाचेक गाणी होती. ठळकपणे आठवतात ती 'घर आजा घिर आयी..', 'मतवाली आँखोवाले..' (ड्युएट) ! एक बोचरी आठवण सांगायची तर.. सचिनदांबरोबर १९५८ पासून दीदींचा अबोला होता. (का? तुम्हीच शोधा!) पण आपल्या मुलाच्या पहिल्या सिनेमाची गाणी होताहेत, म्हणता सचिनदा कौतुकाने तिथे आले होते. आणि.. ते आणि दीदी समोरासमोर येताच.. दीदींचा बांध फुटला. अबोला हवेतच विरून गेला! (पुढे लतादीदी, सचिनदांच्या संगीतातल्या चित्रपटांसाठी गाऊ लागल्या, हे आपल्या रसिकांचं सौभाग्य!) नंतर खूप गप्पा मारल्या दोघांनी.

- अलौकिक - © लेखक - अनंत पावसकर

१९६०-१९६१ नंतरच्या गाण्यांचा दिलखुलासपणे आस्वाद घेतल्यास.. अनेक गाण्यांमधून लतादीदींच्या कलाकिर्दीतील आणखी काही उल्लेखनीय टप्पे थक्क करतात.. समर्थ रामदासांनी सांगितलंय ते आठवलं.. 'जे जे आपणांसी ठावे । ते ते दुसऱ्यांसी सांगावे, शहाणे करून सोडावे, सकळ जन..'. या मताचा अर्थातच मी सुद्धा आहे हो! पण.. शब्दमर्यादा आहेच की! तुमच्यापैकी प्रत्येक वाचक हा मुळात एक 'प्युअर संगीत-रसिक' असल्याने, केवळ उल्लेखनीय गाण्यांची यादी देतोय. (सोबत 'यू-ट्युब'च्या प्ले लिस्टस्' मी देतच आहे!.) गाणी ऐका, पहा. इथे उल्लेखलेलं प्रत्येक गाणं हे टपोऱ्या मोगऱ्याप्रमाणे टवटवीत आणि बकुळीच्या फुलाप्रमाणे हृदयाजवळ जपून ठेवावं असं झकास असल्याचं तुम्हाला जाणवेल. तुम्हाला आठवत असेल! रेडिओवर रात्री 'बेला के फूल' कार्यक्रमात अशा सुरेल धाटणीच्या गाण्यांची रेलचेल असायची. ती गाणी आपण आपल्या कानाजवळ ठेवलेल्या 'ट्रांझिस्टरवर'.. मंद आवाजात ऐकत असू! पापण्या मिटलेल्या असूनही डोळ्यांसमोर, ते गाणं सादर करणारी अभिनेत्री साकारली जायची. हीच दीदींच्या दैवी आवाजाची खासियत!






दि. १३ जून, १९६३ रोजी पार पडलेल्या 'फिल्मफेअर सोहळ्यात' दीदींना 'कहीं दीप जले..' (बीस साल बाद - १९६२) या गाण्यासाठी गौरविण्यात आलं होतं. हे त्यांचं दुसरं 'अ‍ॅवॉर्ड'!.. मित्रांनो! कलावंताला 'मानधन' मिळतं, ते त्यांच्या चरितार्थासाठी असतं. पण त्याचं मन आसुसलेलं असतं ते 'कौतुकासाठी'! पाठीवर कौतुकाची थाप पडली ना, की तो कलावंत आणखी उमेदीने स्वतःला आपल्या कलेत झोकून देतो. दोन 'फिल्मफेअर पुरस्कारांनी' दीदी नक्कीच मनोमन आनंदल्या असतील ना! 'कहीं दीप जले कहीं दिल..' सोबतच 'बलमा माने ना..', 'छम छम नाचत आयी बहार ..', 'ढुंढो ढुंढो रे साजना..', 'दो हंसो का जोडा..', 'मैं तो तुम संग..', 'एहसान तेरा होगा..', 'ओ बसंती पवन..', 'जा..रे, जा रे उड..', 'ज्योति कलश छलके..', 'आप की नजरों ने..', 'तेरा मेरा प्यार अमर..', 'सपने सुहाने लडकपन के..', 'कभी तो मिलेगी..', 'अजीब दास्तां है ये..', 'हम तेरे प्यार में सारा..', 'जिया ले गयो जी..', 'ये हरियाली और ये..', 'एक दिल और सौ..', 'पवन दिवानी..', 'पंख होते तो उड..', 'मिला है किसीका झुमका..', 'वो भूली दास्तां..', 'वो दिल कहां से..', 'ऐ री जाने ना..', 'अगर मुझसे..', 'गुडियाँ हम सें रूठी.', 'लग जा गले..', 'ये तन्हाई हाय रे हाय..', 'ओ जोगी जबसे तू..', 'मोरा गोरा अंग..', 'ये मेरी जिंदगी, इक..', 'रात का समां..', 'आज फिर जीने की..', 'पिया तोसे नैना..', 'मोसे छल किए जा..', 'ओ बेकरार दिल..', 'संसार से भागे..', 'जरा सी आहट..', 'आजा आई बहार दिल ..', 'बेदर्दी बालमा तुझको..', 'एक तू जो मिला..', 'ये समां, समां है ये..' , 'तुम ही मेरी मंदीर..' आणि 'पारसमणी' सिनेमातली दीदींची गाणी!! व्वा! यासारख्या अनेक गाण्यांची खास बात ही, की तुम्ही या गाण्यांचा, कोणत्याही वेळी मनमुराद आस्वाद घेऊ शकता. मग ते गाणं कोणत्या 'रागावर' आधारित आहेत? तो 'राग' दिवसाच्या नेमक्या कोणत्या प्रहरी आळवला जातो.. वगैरे गोष्टी आपल्यासाठी फिजूल असतात.. ही गाणी ऐकताना त्यातली नायिका मनःचक्षूपुढे फेर धरते, हे मात्र नक्की!

- अलौकिक - © लेखक - अनंत पावसकर

इथेच दीदींच्या सादरीकरणात आमुलाग्र बदल झाल्याचं लक्षात येतं. (या सर्व गाण्यांच्या 'लिंक्स्' दिल्या आहेत, ती गाणी तुमच्या 'स्मार्ट-टीव्हीवर' पाहत, त्या गाण्यांचा नक्की आनंद घ्या.. ही नम्र विनंती!..) दुदैवाने याच दरम्यान दीदी आणि महंमद रफी यांच्यात 'रॉयल्टी' वरून बराच वाद निर्माण झाला होता. दोघांनीही एकमेकांसोबत 'ड्युएटस्' गाणं बंद केलं होतं. तसं पाहता लतादीदींच्या एकंदर आयुष्यात खूप जणांशी, अगदी थोड्याश्या कारणावरून खटके उडाले होते.. हे तुम्हीं जाणताच! सी. रामचंद्रजी, राज कपूरजी, एस. डी. बर्मनदा ही आणखी काही उदाहरणं!.. चलता है भाई! त्याचा इथे इश्यू करण्याची गरज नाही. 'इटस् कॉमन थिंग! शेवटी, कोणतीही कलावंत मनाची व्यक्ती मनाने अत्यंत हळवी व शिघ्रकोपी असतेच असते!! (या विषयावर कुणाला अधिक जाणून घ्यायचं असेल.. तर ते इंटरनेटवर मौजूद आहे, इच्छा असल्यास अवश्य वाचा.)



१९६६ हे वर्ष, खरंच वेगळेपण घेऊन आलं होतं. दीदी तेव्हा आपल्या वयाच्या पस्तीशीत होत्या. आता तर त्यांचा आवाज अधिकच प्रगल्भ झाला होता. १९६६ मधल्या लतादीदींच्या काही गाण्यांवर नजर टाकलीत तर.. 'बहारों मेरा जीवन..', 'जाओ रे जोगी तुम..', 'कोई मतवाला..', 'धीरे धीरे मचल..', 'दुनिया में ऐसा..', रूठे सैया हमारे सैया..', 'कुछ दिल ने कहाँ..', 'लो आ गयी..', 'मैने रंग ली..', 'नैनों में बदरा..', 'रहे ना रहे हम..', 'सायोनारा..', 'मेरा साया साथ होगा..', 'सुनो सजना, पपिहेने..' , 'आजा रे प्यार पुकारे..', 'मुझे तुम मिल गए हमदम..', 'रहते थे कभी..', 'पायल की झंकार..', 'आ.. आ भी जा..', 'मारे गए गुलफाम..' अशी काही गाणी सहजच आठवतात.. इथेही तसंच!.. ती गाणी नुसती ऐकतानाही त्यातली नायिका नजरेसमोर येते. 'पंचमदा' लाईम-लाईट मध्ये आले ते 'तीसरी मंजील' (१९६६) मुळे! यातलं 'ऑर्केस्ट्रेशन' वेगळंच आहे. पाश्चात्य पद्धतीची 'हार्मनी' वापरल्याचं प्रकर्षाने जाणवतं. ('हार्मनी' हे काय असतं? तर कृपया तुम्ही 'ने मजसि ने, परत मातृभूमीला..' या गाण्याचा मुखडा नक्की ऐका.) 'पंचमदा.. आशाताईंना झुकतं माप द्यायचे..' असं उगीचच बोललं जात होतं! मात्र यात अजिबात तथ्य नाही. 'उघडा डोळे.. बघा यू-ट्युब'! जी गाणी सन्मा. लतादीदींच्या आवाजाला अनुरूप असतील ती गाणी 'पंचमदा' त्यांना सन्मानानं द्यायचे. 'रैना बीती जाए..', 'बाहों में चले आओ..', 'तेरे बीना जिया..', 'ऐ री पवन..', 'आज कल पांव जमींपर..', 'आजा पिया तोहे..', 'तुझसे नाराज नही..', 'आँधी', 'अजनबी' मधली गाणी छान आठवतात. लतादीदीं 'कव्वाली' सुद्धा गायल्या आहेत बरं! 'तेरी महफिल में किस्मत..', 'सनम तू बेवफा के..', 'अल्ला ये अदा..' , आणि जरासं अलिकडचं 'देर ना हो जाए कहीं..' चटकन आठवताहेत.

- अलौकिक - © लेखक - अनंत पावसकर

१९६७ च्या आसपासच्या काळात लतादीदींच्या काही उल्लेखनीय गाण्यांवर नजर टाकायची तर, 'दिल विल प्यार व्यार..', 'क्या जानूं सजन..', 'गैरों पे करम..', 'मैं तो भूल चली..' नक्कीच आठवतात. 'होठों में ऐसी बात..' या दीदींच्या गाण्यातलं 'ऑर्केस्ट्रेशन' अभ्यासण्याजोगं आहे! 'इन्तकाम' (१९६९) ची एक आठवण सांगायची तर 'आ.. जाने जाँ..' दीदी मनापासून गायल्या खऱ्या पण सिनेमात ते 'हेलन' वर 'कॅब्रे-साँग' म्हणून चित्रित केलं जाईल याची पुसटशी कल्पनाही दीदींना नव्हती. बाप रे! त्या अतिशय चिडल्या. त्यांना समजावण्यात 'लक्ष्मी-प्यारेजी' यशस्वी झाले आणि संगीतकाराच्या संकल्पनेचा दीदींनी मोठया मनाने आदर केला, हे खरंतर आपलं नशीब! (खरंतर, दीदींनी 'अनपढ' (१९६२) साठी मदनमोहनजींच्या संगीतातलं.. 'जिया ले गयो जी..' केलं होतं.. आणि ते चक्क 'बिंदू' वर चित्रित झालेलं. कदाचित याचाच दाखला दिला गेला असेल का? माहीत नाही! 'जल बिन मछली नृत्य बिन बिजली' (१९७१) मधली सर्व गाणी.. हे भारतीय चित्रपट संगीतातील पहिलं 'स्टिरीओफोनिक रेकॉर्डिंग' (संगीतकार : लक्ष्मीकांत-प्यारेलाल) लतादीदींना तो मान मिळाला. संगीतकार राजेश रोशन यांच्या 'काला पत्थर' (१९७९) मधलं 'इक रास्ता है जिंदगी..' गाण्याचा मान सुद्धा दीदींना मिळाला. हे पहिलं 'लेफ्ट-राईट' रेकॉर्डिंग बरं! यात युगलगीतातले गायक 'लेफ्ट-राईट' असे ऐकू येतात. असो!

तुम्हाला आठवत असेल! १९७५ सालच्या 'शोले'च्या आगमनासरशी चित्रपटातील गाण्यांचं महत्त्व खूप कमी होऊ लागलं. पडदा व्यापायला लागला तो 'डायलॉगबाजी, अ‍ॅक्शन, मारधाड वगैरे!' म्हणूनच आपण आधीच्या गाण्यांची विस्ताराने चर्चा केली, कारण त्यात 'मेलडी' ओतप्रोत भरलेली होती. पण नंतर काही प्रमाणात दुष्काळ जाणवत होता. 'शोले' नंतर सिनेमातली चांगली गाणी पूर्णपणे संपली, अशातला भाग नाही, कारण १९७५ चं उदाहरण द्यायचं तर 'आँधी', 'चुपके चुपके', 'फरार', 'उलझन', 'मौसम', 'जमीर', 'छोटी सी बात', 'धर्मात्मा', 'मिली', 'खुशबू', 'सन्यासी', 'प्रेम कहानी' अशा अनेक सिनेमाच्या गाण्यांतून 'लतादीदी' आपल्या मन मुग्ध करणाऱ्या आवाजाने फुंकर घालायला मौजूद होत्या. नंतरच्या काळात पुढची पंधरा-सोळा वर्षे हा सिलसिला भले 'पत्थर के फूल' (१९९१) पर्यंत आस्ते-कदम, परंतु नंतरही अव्याहतपणे सुरू होता. (आठवा.. 'कभी तू छलिया लगता है..!') याच काळात.. अनुराधा पौडवाल, कविता कृष्णमूर्ती, अलका याज्ञिक अशा नव्या फळीच्या गायिका उदयास आल्याने, नंतर त्यांचीच चलती होती. त्यामुळे नंतरच्या काळात दीदींच्या वाट्याला मोजकीच गाणी येऊ लागली. म्हणूनच की काय, १९९४ च्या '१९४२-अ लव्ह स्टोरी' नंतर वाटचाल काहीशी संथ झाली होती. तरीही लतादीदी कार्यरत होत्याच होत्या. २००९ च्या मधुर भांडारकरकृत 'जेल' नंतर त्याचं चित्रपटांसाठीचं गाणं जवळजवळ थांबवलंच म्हणा ना! गायन हा त्यांचा श्वास आणि 'म्युझिशियन नेवर रिटायर्स' या उक्तीप्रमाणे त्या स्वस्थ बसल्या नाहीत. 'प्राईव्हेट अल्बम्स' मधून, 'लाईव्ह कॉन्सर्टस्' च्या माध्यमातून संगीतसेवा करतच राहिल्या, हे विशेष! आपल्या गळ्याला रियाज आणि स्वतःच्या मनःशांतीसाठी त्या गात राहिल्या. त्यांनी 'एच.एम.व्ही' साठी, आपल्या कलाकिर्दीतल्या थोर गायक, संगीतकारांना कुर्निसात करण्यासाठी 'श्रद्धांजली' शीर्षकांतर्गत दहा 'कॅसेटस्' चा अल्बम बनविला. जो आजही सुपरहिट आहे. नंतर गजल, साई मंत्र व आरती संग्रह, भक्तिसंगीत असे बरेच अल्बम्स बनविले.

लतादीदींनी 'गीता बाली' ते थेट 'प्रिटी झिंटा' पर्यंतच्या जवळजवळ सर्वच (सुमारे ७६ हून अधिक) अभिनेत्रींना आपला आवाज दिला आहे. ही सर्व गाणी 'यू-ट्युब' व 'गाना.कॉमवर' पाहता येतील आणि लतादीदींशी संबंधित अनेक लेख 'लताऑनलाईन.कॉमवर' वाचा, ही विनंती! कारण ही यादी खूप मोठी आहे. लतादीदींचं शेवटचं रेकॉर्डींग ३० मार्च, २०१९ रोजी झालं. 'सौगंध मुझे इस मिट्टी की..' असे त्या गाण्याचे शब्द होते आणि ते भारतीय सेन्यदलाला समर्पित होतं. लतादीदी हिंदी चित्रपटांसाठी सुमारे ५३२८ गाणी गायल्या असल्याचं ज्येष्ठ 'गीत-संग्राहक/संशोधक' छातीठोकपणे सांगतात. त्या पंचवीस हजार गाणी गायल्या आहेत या गैरसमजातून त्यांचं नाव 'गिनीज बुक' मध्ये नोंदलं गेलं होतं पण नंतर त्यावर बराच वादविवाद झाल्यानंतर.. ती नोंद नंतर काढून टाकण्यात आली..! खरं सांगू? अशा गोष्टींशी आपलं देणंघेणं नाही. आपण सर्वसामान्य रसिक! त्यांनी गायलेल्या गाण्यांचा मनमुराद आस्वाद घेत, आपली व्यस्त आणि धकाधकीची दिनचर्या आनंदमय करायची, एवढेच आपल्याला ठावे. दीदी आयुष्यभर एकदम साध्या पेहरावात वावरल्या.

तसंच त्या सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमात नेहमी सहभागी असत. सन २००१ मध्ये आपल्या 'मेडिकल फाउंडेशन' द्वारे पुण्यात 'मा. दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलची' स्थापना केली. दीदींनी तब्बल सात दशके संगीत क्षेत्रात अलौकिक कामगिरी केली आहे. येणाऱ्या सर्व पिढ्यांसाठी त्या प्रेरणास्रोत आणि आदर्शवत गायिका ठरल्या आहेत. लतादीदींचा आपल्याला सार्थ अभिमान आहे. रविवार दि. ६ फेब्रुवारी, २०२२ राजी, मातृतुल्य व आपल्या अत्यंत लाडक्या अशा 'लतादीदींचं' आकस्मिक निधन झालं. या 'स्वरदेवतेला' भावपूर्ण श्रद्धांजली. ही पोकळी कधीही भरून निघणार नाही. हे मात्र नक्की!

**© - अनंत पावसकर**

♥






<u>स्वर-सम्राज्ञी लतादीदी यांच्यावरील विविध लेख.. अवश्य वाचा..</u>

https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%B2%E0%A4%A4%E0%A4%BE_%E0%A4%AE%E0%A4%82%E0%A4%97%E0%A5%87%E0%A4%B6%E0%A4%95%E0%A4%B0

https://marathitime.in/lata-mangeshkar-biography-in-marathi/

https://byjusexamprep.com/mpsc/lata-mangeshkar-biography-in-marathi

https://www.marathisocial.com/lata-mangeshkar-information-in-marathi/

https://www.esakal.com/sampadakiya/editorial-articles/editorial-article-writes-lata-mangeshkar-pjp78

https://kaushalsinamdar.in/2020/09/lata-mangeshkar-marathi/

https://www.loksatta.com/vishesh/lata-mangeshkar-s-voice-article-discussing-in-detail-how-the-lata-mangeshkar-era-came-zws-70-2793026/

https://iplmemes.com/lata-mangeshkar-history-in-marathi/

https://infomarathi07.com/lata-mangeshkar-information-in-marathi/

https://www.lokmat.com/filmy/lata-mangeshkar-sad-demise-and-her-later-journey-towards-heaven-a719/

https://kinaramarathicha.com/lata-mangeshkar-biography-in-marathi/

https://divyamarathi.bhaskar.com/news/mag-sanjivani-bhelande-article-about-lata-mangeshkar-5754908-nor.html

https://historicaltouch.com/lata-mangeshkar-biography-in-marathi/

https://deepnaukri.com/lata-mangeshkar-information-in-marathi/

https://majhamaharashtra.co.in/lata-mangeshkar-information-in-marathi/

https://www.mimarathi.net/lata-mangeshkar-information-in-marathi/

https://nibandhmarathi.in/lata-mangeshkar-nibandh-in-marathi/

https://www.marathimol.in/lata-mangeshkar-essay-in-marathi/

https://www.marathimol.in/lata-mangeshkar-information-in-marathi/

https://biographybites.com/lata-mangeshkar-biography-in-marathi/

https://biographybites.com/lata-mangeshkar-biography-in-marathi/

https://ahmednagarlive24.com/latest-marathi-news/lata-mangeshkar-biography-in-marathi/

https://www.inmarathi.io/lata-mangeshkar-information-in-marathi/

https://www.majhimarathi.com/lata-mangeshkar/

https://marathi.indiatimes.com/editorial/samwad/marathi-songs-sung-by-singer-empress-lata-mangeshkar-are-the-subject-of-special-affection-of-the-fans/articleshow/89696255.cms

https://azreview.org/%E0%A4%B2%E0%A4%A4%E0%A4%BE-%E0%A4%AE%E0%A4%82%E0%A4%97%E0%A5%87%E0%A4%B6%E0%A4%95%E0%A4%B0-%E0%A4%AF%E0%A4%BE%E0%A4%82%E0%A4%9A%E0%A5%80-%E0%A4%AE%E0%A4%BE%E0%A4%B9%E0%A4%BF%E0%A4%A4%E0%A5%80/

**संकलक : अनंत पावसकर**

# स्वर-सम्राज्ञी लतादीदी यांची .. ‘आठवणीतली गाणी’

**हिंदी गाण्यांचा संग्रह : ‘यू-ट्युबच्या प्ले-लिस्टस्’**

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi94H4Yd-PodVBGxHibEBELGu&si=PQz6R-4X6g_Pkrv-

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi94H4Yd-PodVBGxHibEBELGu&si=5idXNSiPG1I1IfrG

https://youtube.com/playlist?list=PLQ6zhMjRYyrJe6dskNdqgZQ7_rJsJHILH&si=WV2tAg50XbgVxP8n

https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_mXEh2K7HcOO69dtAlSSSFlydbdymv2IcA&si=6dSgQEEqFcydpZmR

https://youtube.com/playlist?list=PLGAT_DYBcNKAqWUYLBg8HtqFZmHHtceys&si=nAwXRa_GsZfkmsB3

https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_nmMW6Tm2RWdfwqsKa_wQQvVpmrwJqqbE4&si=bQZw8RijE3m0jS67

**मराठी गाण्यांचा संग्रह : ‘यू-ट्युबच्या प्ले-लिस्टस्’**

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi96v8q8QHziKRLLCq8ZtreWE&si=qLq3qvub7gSXLEpv

https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_ntdgN1BPIfX_TSMXIt7vjI-bBnh5CyvR4&si=r9yjFFYXtoCE4uDA





भक्तिगीतांचा संग्रह : ‘यू-ट्युबच्या प्ले-लिस्टस्’

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97Xj2khJIXocSeHoFXPmh7F&si=QHAkFTwkNdOfe8jN

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97uN1ti0oSX40cW42GcAp7I&si=lO8SonK7uGiKM2gY

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi94H4Yd-PodVBGxHibEBELGu&si=5idXNSiPG1I1IfrG

https://youtube.com/playlist?list=PLzzWrWedvWFyzGLPGh34mufczgAZ32jop&si=rQL5a09uHU1ToiRF

https://youtube.com/playlist?list=PLG7lHFm_yZjk5niq1Kf-u-G1sTFnwpGOY&si=psI1qM2Qef1QIigy

https://youtube.com/playlist?list=PLy4YR-PSsLYq1GE94EJ4FF39p0qdkHIJD&si=9ONlFwI9aQBaK0Rf

https://youtube.com/playlist?list=PLyXHXSHxLqKyOGcFTuTqzB9UPUeOJcUHj&si=ga8gmFFvAQ3zeTo2

संकलन : अनंत पावसकर



♥

मराठीतील पहिले ई बुक निर्माते अशी ख्याती असलेले श्री अनंत पावसकर यांनी लिहिलेले व निर्मित केलेले हे स्वर्गीय लताजी यांच्या स्मृतींचे पुस्तक ई साहित्यच्या वाचकांसमोर ठेवताना आम्हाला आनंद होत आहे.

या पुस्तकाबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया श्री अनंत पावसकर यांना कळवाव्यात

मोबाईल – 98200 22417

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)